# बाप्पाच्या गाभाऱ्याखाली

दत्ता खेडेकर







मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ चे काम हाती घेण्यात आले आहे. आजघडीला या मार्गावरील भुयारीकरणाचे काम ९७ टक्के झाले असून, नागरी काम ८० टक्क्यांवर झाले आहे. याच मार्गावर असलेल्या सिद्धिविनायक मंदिर स्थानकाचे कामदेखील वेगाने सुरू आहे. आजघडीला या स्थानकाचे एकूण काम ७० टक्के झाले आहे. दिवसागणिक या कामाचा वेग वाढत आहे. येथील स्थानकावर सुमारे पाचशेहून अधिक कामगार, कर्मचारी काम करीत आहेत. कोरोनाच्या दीड ते दोन वर्षांनी सिद्धिविनायकसह उर्वरित कामांनी पकडलेला वेग उल्लेखनीय आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिद्धिविनायक मेट्रो स्थानकातून थेट सिद्धिविनायक मंदिरात जाता येणार असून, देवस्थानाचे स्थानक असल्याने भविष्यातील सर्वाधिक गर्दीचे स्थानक म्हणून हे ओळखले जाईल, असाही दावा केला जात आहे.